दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १५ ऑक्टोबर २०२५ | अंक २९३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**
१९९९ : भारताच्या गीत सेठी यांना ग्लोबल फ्रेड डेव्हिस पुरस्कार प्रदान.

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 | All Tours घर से घर तक | दिल से दिल तक | I'Time Travel Industry | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा नोव्हेंबरमध्येच धुराळा; लागा मग तयारीला!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल लवकरच वाजणार आहे. मिनी मंत्रालयासह नगरपालिका, नगर परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुकींचा धुरळा उठणार आहे. लोकल बॉडी इलेक्शन नोव्हेंबरमध्ये (Local Body Election in November 2025) घेण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे उणापुरा एक महिनाच पक्ष, नेते आणि कार्यकर्त्यांच्या हातात असल्याचे समोर येत आहे. दिवाळीतील फटाके जपून ठेवा. कारण एका महिन्यानंतरच कदाचित तुम्हाला फटाके फोडण्याचा उत्साह आवरता येणार नाही. येत्या नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या निवडणुकीनंतर राज्यातील महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. दर 20 दिवसांच्या कालावधीने निवडणुका होतील असा दावा सूत्रांनी केला आहे. या मोठ्या अपडेटमुळे कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावणार आहे. कारण दिवाळीनंतर लागलीच या निवडणुकींची लगबग सुरू होईल. यंदा प्रचाराला किती दिवस मिळतात याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. एकतर मोठ्या खंडानंतर ग्रामीण भागात




निवडणुकांचा धुरळा उठणार असल्याने कार्यकर्ते, स्थानिक नेत्यांमध्ये सळसळता उत्साह दिसत आहे नोव्हेंबर अखेरीस निवडणुका जाहीर

नोव्हेंबर अखेरीस नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता सूत्रांनी दिली आहे. त्यानंतर जिल्हा परिषद आणि अखेरीस महानगरापालिका अशा टप्प्याटप्प्याने या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन महिने राज्यात राजकीय हालचाली, फोडाफोडी, आयाराम-गयारामचे राजकारण दिसून येईल. अनेकांचे पक्ष प्रवेश होतील. अनेकांना नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य होण्याचे वेध लागले आहे. भाजपने या निवडणुकीसाठी अगोदरच कंबर कसली आहे. इतर पक्षही मोर्चे बांधणी करत आहेत. पण महायुती आणि महाविकास आघाडी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींना ते ते पक्ष सामोरं जातील का, याचे कार्ड सर्वच पक्षांनी गुलदस्त्यात ठेवले आहे. त्यामुळे काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत दिसून येण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी बंडाळी होऊ शकते. तर काही ठिकाणी काँटे की टक्कर ही दिसतील. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थानिक गणितं वेगळी असल्याने परस्परविरोधी पक्ष एकत्रित येत सत्ता स्थापन करण्याची दाट शक्यता आहे.

## महापुरुषाविषयी अदखलपात्र टिप्पणी उशिरा वकिलावर गुन्हा दाखल

बीड /प्रतिनिधी : सोशल मीडियावर महापुरुषाविषयी अदखलपात्र टिप्पणी करणाऱ्या एका उत्तर प्रदेशातील वकिलावर सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवल्यानंतर बीड पोलिसांनी उशिरा का होईना गुन्हा दाखल केल्याची घटना घडली आहे. सोशल मीडियावर वादग्रस्त टिप्पणी करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली. सोशल मीडियावर उत्तर प्रदेश राज्यातील ग्वाल्हेर येथील एका वकिलाने राज्यघटना आणि महापुरुषाविषयी अदखलपात्र टिप्पणी केल्यामुळे समाजामध्ये असंतोषाचे वातावरण असून याप्रकरणी बीड पोलिसांनी



गुन्हा दाखल करावा असे महागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली होती परंतु त्यांच्या या मागणीला पोलिसांनी कसलाही प्रतिसाद दिला नाही मात्र सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यासमोर राष्ट्रीय मांडल्यानंतर उशिरा का होईना उत्तर प्रदेशातील अनिल मिश्रा या वकिलावर बीड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून येणाऱ्या काळात सोशल मीडियावर वादग्रस्त टिप्पणी करणाऱ्या वर पोलीस प्रशासन लक्ष ठेवून असल्यामुळे विचार करूनच सोशल मीडियावर टिप्पणी करावी असे आवाहनही यावेळी पोलिसांनी केले आहे यावेळी सामाजिक कार्यकर्ते ज्योती सरवदे, मंदा मस्के, ललिता ससाने, पुष्पा तुरुकमारे, कीर्ती शिंदे, सुनीता चव्हाण, शोभा जावळे, अनुराधा तरकसे, रत्ना भंडारे सह आदी उपस्थित होते.

## पालकमंत्री अजित पवारांना आ.संदीप क्षीरसागरांकडून अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर मतदार संघातील विविध मागण्यांचे दिले पत्र

बीड (प्रतिनिधी):- मागील काही दिवसांपूर्वी बीड मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री मा.अजित पवार यांना आ.संदीप क्षीरसागरांनी भेट घेऊन अहवाल सादर केला.आ.संदीप क्षीरसागर यांनी दि.१४ (मंगळवार) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेत अतिवृष्टीच्या नुकसानीचा अहवाल सादर करत विविध मागण्यांचे पत्र दिले. यामध्ये भूस्खलनाच्या धोक्यामुळे कपिलधारवाडी येथे माळीण गावासारखी दुर्घटना होण्याची शक्यता असून या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. तसेच अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झालेल्या आणि पुढील काळात देखील संभाव्य धोका असलेल्या हिंगणी खुर्द गावाचे स्थलांतर करण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. याव्यतिरिक्त बीड मतदार संघातील रस्ते व पूल वाहून गेल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यास मोठी अडचण येत आहे. अनेक गावांचे संपर्क तुटल्याने हे रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावे तसेच काही ठिकाणी नवीन रस्ते आणि पूल करण्यात यावे. यासह सार्वजनिक मालमत्तेचे झालेल्या नुकसानीचा अहवाल अजित



पवारांना सुपूर्द करून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली.

## १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी

### राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न

बीड दि. 14 :- दिनांक 30 सप्टेंबर, 2025 (मंगळवार) रोजीपासून पदवीधर मतदार नोंदणी सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाने 5 औरंगाबाद पदवीधर मतदार संघाच्या दि. 01 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणे बाबतचा कार्यक्रम घोषीत केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशीत अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय, सर्व तहसिल कार्यालयामध्ये मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचेसमवेत दि. 30 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 4.30 वा. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये दि. 01 नोव्हेंबर 2022 पुर्वी उत्तीर्ण झालेल्या नागरीकांनी पदवीधर मतदार यादी नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीमध्ये नोंदणीसाठी नमुना अर्ज 18 भरून नोंदणी करणे अनिवार्य असल्याची माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी करण्यासाठी पुढील कार्यपध्दीती वापरावी.

नमुना अर्ज क्र. 18 ( संपुर्ण निळ्या किंवा काळया शाईने मराठी किंवा इंग्रजी मध्ये भरलेला. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाचे पदवी प्रमाणपत्र किंवा पदवीच्या अंतीम वर्षाची मार्कशीट ची झेरॉक्स प्रत.पासपोर्ट साईज फोटो (01 अर्जावर नमूद ठिकाणी चिटकलेला, व 01 अर्जासोबत स्टेपल करुन द्यावा.मतदान ओळखपत्र किंवा आधार कार्ड यापैकी एक अर्जासोबत सर्व कागदपत्र ही स्व-साक्षांकित करावीत व 01 फोटो हा अर्जावर चिकटवावा (स्टेपल करु नये) व 01 फोटो अर्जासोबत पारदर्शक कॅरेबॅग मध्ये स्टेपल करुन सादर करावा. विवाहीत महिलांच्या नावात बदल असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा रात्रपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरचे अर्ज हे मंडळ निहाय महसूल मंडळाचे मुख्यालयी मंडळ अधिकारी यांचेकडे सादर करता येतील अर्जदार हा नौकरदार असेल तर त्यांनी अर्जासोबत 3 री अनुसूची मधील विहीत नमून्यातील प्रमाणपत्र हे राजपत्रित अधिकारी यांचे स्वाक्षरीने जोडणे आवश्यक आहे. कार्यालय / शाळा कडून एकगठ्ठा पध्दतीने आलेले अर्ज हे सादर करताना उपरोक्त सर्व सुचना प्रमाणे तयार करुन एकत्र 01 यादी तयार करुन ती सादर करावी. तसेच https://mahaelection.gov.in/Citizen/Login या प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे , ऑनलाईन पध्दतीने नमुना अर्ज 18 सादर करता येतील.

या कार्यक्रमानुसार दिनांक 06 नोव्हेंबर, 2025 पर्यंत पदवीधर नोंदणीसाठी नमुना अर्ज 18 भरण्याची अंतिम तारीख आहे, दिनांक 06 नोव्हेंबर, 2025 पर्यंत झालेल्या नोंदणीची दि. 25 नोव्हेंबर 2025 रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द होणार आहे, प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीनंतर दिनांक 25 नोव्हेंबर 2025 ते 10 डिसेंबर, 2025 या कालावधी दावे व हरकती स्विकारण्यात येतील, दिनांक 25 डिसेंबर, 2025 रोजी प्राप्त दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करण्यात येईल व अंतिम मतदार यादीची प्रसिध्दी दिनांक 30 डिसेंबर, 2025 रोजी होईल. करीता बीड जिल्ह्यातील दि.01 नोव्हेंबर 2022 पुर्वी पदवी उत्तीर्ण असणारे सर्व नागरिकांना 5 औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने तयार करण्यात येणाऱ्या मतदार यादीमध्ये जास्तीत जास्त नोंदणी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहाकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, बीड तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, औरंगाबाद पदवीधर मतदार संघ यांचे तर्फे करण्यात आले आहे.

## ऊसतोड कामगारांचा लढा आझाद क्रांती सेना तीव्र करणार राजेश घोडे

(माजलगाव प्रतिनिधी) दिनांक 14 ऑक्टोबर 2025 रोजी हॉटेल वेंकटेश माजलगाव येथे ऊसतोड कामगारा व POSH कायदा संवाद सभेचे आयोजन राजेश घोडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते

या संवाद सभेला मार्गदर्शन करण्यासाठी चळवळीतील ज्येष्ठ अशोक तांगडे, एडवोकेट एस एस कसबे, आझाद क्रांती सेना माजलगाव तालुकाप्रमुख अशोक ढगे, किसन भिसे सर यांनी उपस्थित राहून सभेला संबोधित केले याप्रसंगी बोलताना राजेश घोडे म्हणाले की देशात अनेक कायदे असतानाही महिला कामगार ऊसतोड मजूर व आन्य समूहांवरती हल्ले व शोषण होत आहे या शोषणाच्या विरोधात शोषण विरहित समाज निर्माण करण्यासाठी व कायद्याची




कडक अंमलबजावणी करण्यासाठी संवेदनशील असणारे नेतृत्व संसदीय लोकशाहीमध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाठवावी लागतील वेगवेगळ्या राजकीय सत्तेवरती संवेदनशील लोक बसल्याशिवाय सर्वसामान्यांना न्याय मिळणार नाही आणि येणाऱ्या काळात या सर्व बाबींचा विचार करून समाजा मधल्या तरुणांनी आता संघटन मजबूत केले पाहिजे असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले याप्रसंगी अशोक तांगडे यांनी संघटन बांधणी संघटन कौशल्य व सद्यस्थितीवर प्रकाश टाकला तर एडवोकेट एस एस कसबे यांनी महिला हिंसा व कामावरील होत असलेल्या महिला छळातून संरक्षण देणारा POSH कायद्याची माहिती दिली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मीनाताई वारभंग, प्रदीप साळवे, शेख अकबर भाई, तुकाराम जाधव,गणेश कांबळे, कैलास गायकवाड, आकाश हातागळे, राहुल गायकवाड, नवनाथ लोखंडे, संजय हिवाळे, लखन आलाट, आदींनी परिश्रम घेतले

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत घारापुरी येथील सुशिक्षित बेरोजगारांना लोकल गाईड ओळखपत्र प्रदान.



उरण दि १४ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत घारापुरी येथील सुशिक्षित बेरोजगारांना लोकल गाईड म्हणून दिनांक १४/१०/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे छोटेखानी झालेल्या कार्यक्रमात ओळखपत्र देण्यात आले.घारापुरी हे बेट असल्याने बेटावर रोजगारासाठी अन्य कोणताही पर्याय नसल्याने या ओळखपत्रामुळे सदरच्या ग्रामस्थांना रोजगार करण्यास सोपे जाणार आहे.याआधी सुद्धा ग्रामपंचायत मार्फत लोकल गाईड यांना ओळखपत्र देण्यात आले आहे. घारापुरी ग्रामपंचायतच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना सेवा सवलती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यात येतात. ग्रामपंचायत जणकल्याणासाठी नेहमी अग्रेसर असल्यामुळे जनतेनी या ग्रामपंचायतच्या कार्याचे कौतुक केले आहे.

## लाडेवडगावात ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्याला गर्दी संत, कीर्तनकारांची उपस्थिती; ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन



### राज्यभरातून भाविकांची हजेरी

अर्जुन महाराज लाड यांचे अनुयायी, भाविक व विद्यार्थी राज्यभरात मोठ्या संख्येने आहेत. या सोहळ्यास भाविकांची लक्षणीय गर्दी होती. यावेळी मांडे जेवणाचा आस्वाद घेण्यात आला. कार्यक्रमासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

केज (प्रतिनिधी) दि.१४ : तालुक्यातील होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्यानिमित्त अखंड रामकृष्णहरी नामजप यज्ञ सोहळ्याची सांगता लाडेवडगाव येथील वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमावर मंगळवारी (दि. १४) झाली. यावेळी ज्ञानसिंधू ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. या सोहळ्यास स्वामी भारतानंद गिरी, नामदेव महाराज शास्त्री, महादेव महाराज चाकरवाडीकर, लक्ष्मण महाराज मेंगडे, आदिनाथ महाराज, मनिषानंद स्वामी, सोपान महाराज सानप, महारुद्र खाडे महाराज, प्रकाश महाराज साठे, नाना महाराज कदम, पांडुरंग महाराज मुंडे, डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री, आप्पा महाराज चौरे, अर्जुन महाराज लटपटे, पांडुरंग महाराज डोंगरेश्वर यांच्यासह राज्यभरातील वारकरी संप्रदायातील संत-महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील माजी मंत्री पंडितराव दौंड, नंदकिशोर मुंदडा, रमेश आडसकर, काशीराम कराड, भाई ज्ञानोबा मुंडे, बन्सी सिरसट, संतोष हांगे, विष्णू घुले, हिंदूलाल काकडे, नेताजी शिंदे, सूर्यभान मुंडे, पिंटू ठोंबरे, सौरभ सोनवणे, भगवान केदार, दत्ता धस, अयोध्याताई केंद्रे आदी मान्यवरही उपस्थित होते. यावेळी मान्यवरांसह अनेकांनी अर्जुन महाराज लाड यांचे अभिष्टचिंतन करत सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाडेवडगाव व होळ ग्रामस्थांसह भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे आजी-माजी विद्यार्थी आणि भाविकांनी परिश्रम घेतले.

### नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते अर्जुन महाराज लाड यांचा सत्कार

नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते अर्जुन महाराज लाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले, "अर्जुन महाराज लाड यांनी वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रम व भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना करून वारकरी संप्रदायात मोठे योगदान दिले आहे. त्यांनी आयुष्याची ६१ वर्षे पूर्ण केली असून ते ३४ अपघातांतून बचावले आहेत. यामागे पांडुरंगाची कृपा आहे." भगवानगडाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत असून ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरानंतर पहिल्यांदाच भगवानगडावर मंदिर उभारण्यात येत आहे. त्या सोहळ्याचे निमंत्रणही याप्रसंगी देण्यात आले.

# संपादकीय

## कोणत्या कामासाठी वापरला जातो रेअर अर्थ एलिमेंट,

### रेअर अर्थ एलिमेंटमध्ये कोणाचा दबदबा !



रेअर अर्थ एलिमेंट्सला आधुनिक तंत्रज्ञानाचा कणा मानला जाते. हे १७ खास धातू असून जे आपल्या रोजच्या जीवनात वापरल्या जाणाऱ्या जवळपास प्रत्येक हाय टेक गॅझेट, मशीन्स, शस्त्रास्त्रांत महत्वाची भूमिका निभावतात. मोबाईल फोनपासून इलेक्ट्रीक कार, सोलर पॅनल, क्षेपणास्त्र आणि सॅटेलाईटपर्यंत प्रत्येक जागी यांचा वापर केला जातो. या रेअर एलिमेंट्समध्ये चीनचे वाढते प्राबल्यामुळे जागतिक बाजारात तणाव वाढला आहे. अलिकडेच चीनने या रेअर अर्थ एलिमेंट्सच्या निर्यातीवर कठोर नियम लागू केले आहेत. त्यामुळे याच्या आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीवर गंभीर प्रभाव पडला आहे. कोणत्या कामासाठी हे धातू वापरले जातात आणि कोणत्या देशांकडे हे रेअर अर्थ एलिमेंट्स भरपूर आहेत. इलेक्ट्रॉनिक्समध्ये स्मार्टफोन, लॅपटॉप, टेलिव्हीजन आणि कॅमेरा यात मायक्रोचिप्समध्ये या धातूंचा वापर केला जातो. यात नियोडिमियम आणि प्रासियोडिमियम सारखे धातूंचा वापर होता. इलेक्ट्रीक कार आणि हायब्रिड वाहनांच्या मोटर्समध्ये रेअर अर्थ मॅग्नेट्स वापर केला जात होता, ज्यामुळे ते हलका किंवा अधिक पॉवरफूल बनवतो. संरक्षण क्षेत्रात क्षेपणास्त्र, जेट इंजिन, नाईट व्हीजन डिव्हाईस आणि रडार सिस्टीम यात देखील या धातूंची मोठी भूमिका असते. ऊर्जा क्षेत्रात विंड टर्बाईन, सोलर पॅनल आणि रिचार्जेबल बॅटरीत रेअर अर्थ मटेरियल्सचा वापर वेगाने वाढत आहे. मेडिकल टेक्नॉलॉजीत एमआरआय मशिन, लेझर सर्जरी आणि डायग्नोस्टीक उपकरणात हे अत्यंत महत्वाचे असते. म्हणजेच जगातील प्रत्येक आधुनिक तंत्रज्ञानात कोणत्या ना कोणत्या रुपात हे १७ रेअर अर्थ एलिमेंट्स वापरले जातात.

कोणते देश आहेत सर्वात मोठे खिलाडी ?

चीनचीन हा जगातला सर्वात मोठा रेअर अर्थ भंडार असलेला देश आहे. चीनमध्ये या धातूंचा जगातील जवळपास अर्धा साठा ( ४४ मिलियन मेट्रीक टन ) आहे. केवळ उत्खनन, प्रोसेसिंग आणि जागतिक पुरवठा साखळीवर चीनचे नियंत्रण आहे. गेल्या काही वर्षात चीनने त्याच्या रेअर अर्थ एलिमेंट्समुळे जागतिक बाजारपेठेत आपले नाव आणखीन मजबूत केले आहे.

ब्राझील जगात याबाबत ब्राझील दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे २१ मिलियन मेट्रीक टन भंडार आहे. हे भंडार विशाल असले तरी संपूर्णपणे विकसित झालेले नाही. ब्राझील त्यांचे उत्पादन वाढवणे आणि जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी शोध आणि उत्खनन दोन्ही क्षेत्रात सातत्याने प्रयत्न करत आहे.

भारत भारताच्या जवळ ६.९ मिलीयन मेट्रीक टन रेअर अर्थचे भंडार आहे. तसेच देशाच्या समुद्र किनारे आणि वाळू तसेच खनिज पुरेसे आयआयआय उपलब्ध आहे. जे जागतिक पुरवठ्यासाठी महत्वपूर्ण योगदान देते. भारताचे उत्पादन सातत्याने वाढत आहे. आणि हे मुलद्रव्यांचा औद्योगिक वापर वाढावा यासाठी पायाभूत संरचनेत भारत गुंतवणूक करीत आहे.

ऑस्ट्रेलिया ऑस्ट्रेलिया या यादीत चौथ्या स्थानी असून या देशात ५.७ मिलीयन मेट्रीक टन रेअर साठा आहे. तसेच अनेक खाण उद्योग सुरु आहेत. स्थिर खणन धोरणे आणि समृद्ध साठ्यांमुळे ऑस्ट्रेलिया जागतिक बाजारातील एक प्रमुख खेळाडू म्हणून पुढे येत आहे.

रशियारशियाकडे जवळपास ३.८ मिलीयन मेट्रीक टन रेअर अर्थचा साठा आहे. हे आधीच्या अंदाजित आकड्यांच्या तुलनेत याचे प्रमाण थोडे कमी आहे.

# तोपर्यंत नोकर भरती नको, जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

धाराशिव। प्रतिनिधी राज्यात अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील बहुतांश शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं असून राज्य सरकारने ३२ हजार कोटींचं पॅकेजही जाहीर केलं आहे. दिवाळीपूर्वी शेतकऱ्याच्या खात्यावर मदतीची रक्कम देण्यात येईल, असे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. त्यानुसार, काही मदतीची रक्कम जमा होण्यासही सुरुवात झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आता शेतकऱ्यांसाठी न भुतो न भविष्यती आंदोलन उभारण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच, शेती नुकसानीच्या पंचनाम्यामुळे कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी सरकारला १५ दिवसांचा वेळ जरांगे पाटलांकडून देण्यात आला आहे. मात्र, कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. शेतकरी हा महत्वाचा घटक असून आम्ही शेतकऱ्यांची लेकरं आहोत. त्यामुळे, अतिवृष्टीने झालेल्या शेती नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सरकारला १५ दिवसांचा अवधी देण्यात येत आहे. मात्र, कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातील डिकसळ येथे आले जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधत पुढील दिशा स्पष्ट केली. दरम्यान, राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत २ सप्टेंबर रोजी कुणबी प्रमाणपत्रासंदर्भातील शासन आदेश जारी केला.



हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे हा शासन निर्णय झाल्याने मराठवाड्यातील कुणबींना ओबीसीतून आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर आता जरांगे पाटील शेतकरी प्रश्नावर बैठक घेणार आहेत. दिवाळीनंतर या बैठकांचे नियोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. गेल्या १०० वर्षात शेती प्रश्नावर उभारले नाही असे आंदोलन उभं करण्याचा निर्धार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगला निर्णय घेतला, फडणवीसांचे कौतुक करत दिलेला शब्द पाळा ही विनंतीही जरांगे पाटील यांनी आरक्षण कुणबी प्रमाणपत्र वाटपावरुन केली आहे. मनोज जरांगे पाटील आता मराठा आरक्षणनंतर शेती प्रश्नावर लढा उभारणार आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी दिवाळी झाल्यावर राज्यव्यापी बैठक घेऊन आंदोलन उभारणार असल्याची घोषणा पाटील यांनी केली. असं आंदोलन उभा करावं लागेल की इथून पुढे अन् इथून मागे १०० वर्षात अस आंदोलन कोणी केल नसेल, तेव्हाच शेतकऱ्याच्या मागण्या मान्य करु घ्याव्या लागतील. मुंडक्यावरच पाय द्यावा लागेल, नुसतं वावरात फिरल्याने, भाषण केल्याने, चिखलात फिरल्याने शेतकऱ्यांचा उद्ध्वस्त झालेला संसार भरुन निघणार नाही. शेतकऱ्याच्या पिकाला चांगला भाव द्यायचा असेल, कर्जमुक्ती करायची असेल, नुकसानीची शंकर टक्के भरपाई द्यायची असेल तर ताकतीने आंदोलन लावून धरावं लागणार आहे, त्यासाठी मी प्रयत्न करतोय, असेही पाटील यांनी म्हटले.

# स्वातंत्र्याच्या ७५ नंतर ही मिळेना जातीचे प्रमाणपत्र महादेव कोळी समाजाचा उपोषणाचा दुसरा दिवस

माजलगाव भारत स्वतंत्र झाला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला तरी महादेव कोळी समाजाला अद्यापही शासनाच्या योजना पासून वंचित राहावे लागत असून उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दोन दिवसापासून उपोषण सुरू आहे

महादेव कोळी समाज माजलगाव मतदार संघात मोठ्या प्रमाणात रहिवासी आहे शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती अमृत महोत्सव होऊन गेला तरी त्याचा लाभ महादेव कोळी



समाजाला जात प्रमाणपत्र नसल्यामुळे घेता येत नाही सामाजिक दृष्टया हा समाज मागास असून सुद्धा सामाजिक पर्वरात आणण्यासाठी शासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे गेल्या अनेक दिवसापासून जात प्रमाणपत्र मिळावे यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयात अर्ज दाखल असूनही उपविभागीय कार्यालयात फाईल पडून आहेत यावरून प्रशासनाचा उदासीनपणा दिसून येतो जोपर्यंत जात प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचे मुंजाराम गाडेकर यांनी सांगितले या उपोषणात श्री. मुंजाराम ज्ञानोबा गाडेकर श्री.दिपक मोतीराम पतंगे श्री ज्ञानेश्वर कांबळे हे बसले आहेत

**उपोषणस्थळी आंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर रात्रीच्या वेळी उपोषणकरते यांना अनेक समस्येचा सामना करावा लागत आहे रात्रीच्या वेळी अंधारात उपोषण सुरू असून याकडे प्रश्न प्रशासनाचे दुर्लक्ष आहे**

मतदानावर घालणार बहिष्कार

कोणताच राजकीय पक्ष महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येत नसून आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद निवडणुकित समाज मतदानावर बहिष्कार घालणार असल्याचा निर्धार केला आहे...

## ना. भुजबळ यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेस माजलगाव

# तालुक्यातील हजारो ओबीसी जाणार - खेत्रे, संतोष रासवे माजलगाव तालुक्यातील गाव, तांड्यावरील ओबीसी एकवटणार!





माजलगाव / प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेच्या अनुषंगाने समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गाव, तांड्यावर बैठका घेण्यात आल्या आहेत. माजलगाव तालुक्यातील दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव सभेला जाणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुकाध्यक्ष जगन खेत्रे, युवा नेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे.



शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला माजलगाव तालुक्यातून दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव उपस्थित राहणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुका अध्यक्ष जगन खेत्रे, युवानेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे.

# श्री तुळजा भवानी मंदिर देवस्थानच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना 400 मदत किटचे वाटप!

## देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे मनःपूर्वक आभार- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी लोक इच्छा- बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या भीषण पूरस्थितीत शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या कठीण प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक यांच्या वतीने पूरग्रस्तांना दिलासा देण्यात आला. काल दि. 13 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11. 00 वाजता सिंदफणा नदीकाठी वसलेल्या तांदळवाडी व आहेर चिंचोली या गावांमध्ये देवस्थानाकडून पूरग्रस्त नागरिकांना ४०० किराणा मदत किटचे वाटप करण्यात असून मदतकार्य देवस्थानाचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष माजी आमदार ॲड. शिवाजी सहाणे, सचिव सुभाष पाटोळे, सदस्य राजेंद्र गायकवाड, रवींद्र गायकवाड, प्रमोद लोणकर, बाळासाहेब चव्हाण, दिलीप कदम, अरुण गायकवाड व महेश पाटोळे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात आणि डोळ्यात पाणी असताना आम्ही फुल नाही फुलाची पाकळी देण्याचा प्रयत्न करत आहोत. दिवाळी अगोदर सरकारकडून मदत जाहीर होणारच आहे. मात्र आज श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान, नाशिक वतीने आपल्या घरात मदत किट पोहचवल्या जात आहेत, याबद्दल देवस्थानच्या सर्व विश्वस्तांचे मी आभार मानतो असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले. श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या या मदतकार्यामुळे पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकट काळात समाजासाठी पुढे येणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत कौतुक केले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल जाधव, उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, तालुका प्रमुख संतोष जाधव, उपशहरप्रमुख हनुमानप्रसाद पांडे तसेच





आकाश जगताप, लक्ष्मीकांत दोडके, प्रतिक कांबळे आणि योगेश सारुक उपस्थित होते.

### निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी- ॲड. शिवाजी सहाणे

श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थान यांच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना छोटीशी मदत म्हणून निदान दोन दिवसाची का होईना चूल पेटावी या भावनेने किराणा मदत किटचे वाटप करत आहोत. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गावोगावी गरजवंत शेतकऱ्यांची यादी बनवून सर्वांना कसा लाभ मिळवून देता येईल यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मदतीमुळेच आम्ही आज आपणा पर्यंत पोहचू शकलो," असे मत माजी आमदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे यांनी व्यक्त केले.

ooooo

## सुगंधी राजस उटणे



दीपावली म्हणजे आनंदाचा, सुखाचा, दिव्यांचा आणि सर्वात महत्वाचे कुटुंबाचा सण. गोड फराळ, फटाके, रोषणाई, कंदील, दिवे याच सोबत घराघरात सुगंध असतो तो उटण्याचा.
दिवाळीची सुरुवातच मुळी होते ती पहाटेच्या अभ्यंग स्नानाने. यासाठी आपण बाजारातून तयार उटणे विकत आणतो आणि वापरतो.
लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना हे उटणे वापरले जाते. पण आपण आणलेले उटणे हे खरोखरच चांगल्या दर्जाचे आहे का ? याची पडताळणी आपण करत नाही. त्यामुळे त्याच्या वापरणे उपयोग होण्या ऐवजी बरेचदा त्रास होतो. त्यामुळे हल्ली काही लोक त्याचा वापर करण्याचे टाळू लागले आहेत. आणि सुगंधी साबण आणून वापरू लागले आहेत.

खरं तर अभ्यंग स्नान हा आपल्या परंपरेतील एक पवित्र संस्कार आहे. पूर्वी घराघरांतून जसा फराळ बनवला जातो त्याप्रमाणे उटणे देखील बनवले जात असे. फक्त दिवाळी पुरतेच नाही तर उटण्याचा वापर रोजच्या आयुष्यात अंघोळीसाठी केला जात असे. गरिबापासून राजापर्यंत सर्वजण त्यांचा वापर करत. शरीराचे बाह्य शुध्दीकरण, त्वचा विकारांपासून संरक्षण या मूळ उद्देशाने याचा वापर केला जाई. बदलत्या काळानुसार याचा विसर पडू लागला. आणि विविध साबणांनी त्याची जागा घेण्याचे काम सुरू केले. निसर्ग आणि आयुर्वेदाचे वरदान लाभलेल्या आपल्या भूमीत बदलत्या अधूनिकीकरणामुळे ह्या गोष्टी मागे पडू लागल्या.

निसर्गाने दिलेल्या मौल्यवान वनस्पतीचे ज्ञान बरेचदा ऋषीमुनींना माहीत असे. राजाश्रय मिळवण्यासाठी अनेकदा ही माहिती गोपनीय ठेवली जात. त्यामुळे सामान्य लोकांना याची माहिती कमी प्रमाणात होती. जंगलातून योग्य वनस्पती शोधून त्या वेचून आणणे, त्यांना उन्हात सुकवणे, कापणे, खलबत्त्यात कुटून बारीक पावडर करणे, चाळून घेणे अशा प्रदीर्घ प्रक्रियेतून हे उटणे तयार केले जात असे. त्यासाठी लागणारी मेहनत व कालावधी मोठा असल्याने, तसेच आपले वर्चस्व राखून ठेवण्याहेतू ही माहिती सहजासहजी दुसऱ्याला दिली जात नसे.
पण आज जशी जगाने प्रगती केली आहे तशीच आयुर्वेदाने बदलत्या काळाचा, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून याच अवघड गोष्टी देखील सोप्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच उटण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वनऔषधी आज पावडर स्वरूपात आयुर्वेदिक औषधालयात सहज विकत मिळतात.

निसर्गातील हेच एक उपयुक्त गुपित आज मी तुम्हाला सांगणार आहे. परंपरेगत वापरले जाणारे सुगंधी उटणे कसे तयार करावे ? याची पूर्ण माहिती या लेखात दिली आहे.

राजस सुगंधी उटणे -
यासाठी लागणारे जिन्नस खालील प्रमाणे घ्यावेत -
1 - नागर मोथा - 200 ग्रॅम
2 - गव्हला काचोरा - 200 ग्रॅम
3 - कापूर काचारी - 100 ग्रॅम
4 - बावची - 50 ग्रॅम
5 - चंदन पावडर - 50 ग्रॅम
6 - अनंत मूळ - 50 ग्रॅम
7 - मुलतानी माती 50 ग्रॅम
8 - लोध्र - 50 ग्रॅम
9 - वाळा - 10 ग्रॅम
10 - आंबेहळद 10 ग्रॅम

या सर्व वनऔषधी पावडर स्वरूपात आयुर्वेदिक दुकानातून आणाव्यात. एक एक करून सर्व औषधी बारीक चाळणीने चाळून एकत्र कराव्यात. हे झाले आपले सुगंधी राजस उटणे तयार.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेत ज्येष्ठ समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे यांचा सहभाग

उरुळी कांचन: आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार, राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र शासन ,जिल्हा परिषद आरोग्य विभाग व उरुळी कांचन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र उरुळी कांचनद्वारा विविध ठिकाणी पल्स पोलिओ बुध वर पल्स पोलिओ लसीकरण करण्यात आले. येथे डॉ. रवींद्र भोळे आरोग्य सेवा केंद्राद्वारे पाच वर्षाखालील बालकांना पल्स पोलिओ चे डोसेस देण्यात आले. ज्येष्ठ समाजसेवक ,प्रवचनकार ,अपंग सेवक डॉ.रवींद्र भोळे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे




वैद्यकीय अधिकारी डॉ.सूर्यकांत हनुमंते, सौरभ पवार , गणेश सहारे हे आरोग्य सेवक, स्मिता सचिन चव्हाण आशा वर्कर, मीरा लिंबोने अंगणवाडी शिक्षिका,मुक्ता डोके मदतनीस यांनी लसीकरणाला सहकार्य केले. याप्रसंगी प्रतिनिधींजवळ आपले मत व्यक्त करताना ज्येष्ठ समाजसेवक अपंग सेवक डॉ. रवींद्र भोळे म्हणाले की पल्स पोलिओ मोहीम या राष्ट्रीय कार्यक्रमात 1995 पासून या मोहिमेला सहकार्य करीत आहोत, उरुळी कांचन येथे प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे डॉ. रवींद्र भोळे पल्स पोलिओ बूथ यासाठी चालविला जातो. पोलिओ मायलेटीस या संसर्गजन्य विषाणू मुळे अर्धांगवायू ,अपंगत्व येऊ शकते. यासाठी पोलिओ निर्मूलनाचे उच्चाटन करण्यासाठी व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी पाच वर्षाखालील बालकांना पल्स पोलिओ मोहीम अत्यंत उपयुक्त आहे. या राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा पाच वर्षाखालील बालकांनी लाभ घ्यावा.

# सगर दीपोत्सव दिवाळी अंक ज्ञान दानाचा मानबिंदु

वासुदेवराव बोराडे अमरावती
शैलेश रौंदळ नाशिक प्रतिनिधी" अल्पावधीत सगर साहित्य निर्मितीतील नाशिक नगरीतून किर्तन रत्न ह.भ.प. जयराम बाबा गोंडेगावकर यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आलेल्या सगर दीपोत्सव दिवाळी अंक २०२५ दिवाळीपर्व आधिच रसिक मनावर गारूड करून राहिल्याने सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे. साहेबराव नंदन तात्या यांच्या कल्पकतेतून खुमासदार संकलनातून वैचारिक विषयांचे अध्ययनाचा यंदाचा चौथा दिवाळी अंक हा खऱ्या अर्थाने



ज्ञान दानाचा मानबिंदु ठरू पाहात असल्याची प्रतिक्रिया विदर्भातील अमरावती येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व सगर समाज भूषण सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता मा. वासुदेवराव बोराडे यांनी दिल्याची माहिती संपादक साहेबराव नंदन तात्या यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली. गेल्या तीन वर्षातील यंदाच्या दिवाळी अंकाचे दहावे प्रकाशन करण्यात आल्याने साहित्य क्षेत्रात आनंदोत्सवी प्रतिक्रिया उमटत असल्याने वासुदेवराव बोराडे यांनी आनंद व्यक्त करतांना संपादक व त्यांच्या सर्व टीमचे कौतुक केले आहे व हितचिंतकांना धन्यवाद दिले आहेत. गेल्या तीन वर्षातील सगर साहित्य व सगर दीपोत्सव दिवाळी अंक हा अंक नसून सामाजिक सांस्कृतिक ज्ञानसाधनेचा अनमोल ठेवा आहे. तो जतन करणे वाचक रसिकांचे आद्य कर्तव्य आहे असेही श्री बोराडे यांनी सांगितले. अंकाच्या माध्यमातून मुखपृष्ठापासून पाठराखण पर्यंत ते अंतरंगात डोकावून पाहिले असता ज्ञान विज्ञान अध्यात्म आणि मनोरंजन याची साचेबद्ध मांडणी करण्यात आली आहे. छपाई बांधणी शुभेच्छा सर्वच काही अप्रतिम

# मनाचे श्लोक-दासबोध जीवनमार्गदर्शक : मीराताई लिमये

इतिहासातील अनेक संदर्भ अभ्यासले असता समर्थ रामदास लिखित मनाचे श्लोक आणि दासबोध हे जीवन मार्गदर्शक ग्रंथ असून त्यांचे अमूल्य योगदान असल्याचे प्रतिपादन दासबोध ग्रंथाच्या अभ्यासिका मीरा लिमये यांनी केले. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या दीपाली हरेश देशपांडे लिखित दासबोध दर्शन या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर लेखिका दीपाली देशपांडे आणि प्रकाशक डॉ. संतोष राणे उपस्थित होते.
लेखिका दीपाली हरेश देशपांडे यांच्या दासबोध दर्शन या पुस्तकाचे रविवार दि. १२ ऑक्टोबर रोजी ठाण्यातील सहयोग मंदिर येथे दासबोधाच्या अभ्यासक मीरा लिमये यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी




त्या बोलत होत्या. ङ्गलोकमान्य टिळक यांनी तुरुंगात असताना गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. तुरुंगात असताना टिळकांनी जे ग्रंथ अभ्यासले त्याची यादी उपलब्ध आहे त्यात टिळकांनी तुरुंगात ५२ वेळा दासबोध हा ग्रंथ अभ्यासासाठी मागवला होता अशी नोंद सापडते. वासुदेव बळवंत फडके गोंदवलेकर महाराज यांच्याकडे गेले आणि त्यांना म्हणाले की ङ्गतुम्ही समर्थ व्हा आणि मी शिवाजी होतोफ हेही त्यांनी सांगितले. दासबोधातील अनेक ओव्यांच्या आधारे आजच्या काळातही त्याचे महत्त्व कसे टिकून आहे. भारतीय स्वातंत्र्ययुद्धातील अनेक नेत्यांनी या ग्रंथातून प्रेरणा घेतल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. म्हणूनच मराठी भाषा आणि मराठी ग्रंथ पुढच्या पिढीला समजले पाहिजेत, त्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत तसेच मोठ्या संत-म हात्म्यांविषयी बोलताना लोकांनी जबाबदारीने बोलावे, त्यांची बदनामी होणार नाही याची काळजी घ्यावी,असेही त्या म्हणाल्या
या वेळी लेखिका दीपाली हरेश देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संतसाहित्याचे अभ्यासक असणारे त्यांचे वडील व लेखिका असणारी आई यांच्याकडून त्यांना हा वारसा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. दासबोध समर्थ रामदास स्वामींनी सतराव्या शतकात लिहिलेला ग्रंथ आहे. आजही त्यातील आशय महत्त्वाचा आहे. परंतु त्या काळातील भाषा आणि आजच्या काळातील गतिमान जीवन यामुळे ग्रंथवाचनासाठी वेळ काढणे लोकांना अवघड जाते. म्हणूनच या ग्रंथातील आशय थोडक्यात आणि सोप्या शब्दात लिहून तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दासबोध दर्शन हे पुस्तक लिहिल्याचे त्यांनी सांगितले.
कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हरेश देशपांडे यांनी केले तर निवेदन सिद्धार्थ देशपांडे यांनी केले. शारदा प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या या समारंभास ठाणेकरांनी उत्तम प्रतिसाद दिला.

# विजय कदम यांना प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड जाहीर

महाराष्ट्र शासन, मान्यताप्राप्त सहाय्य धर्मादाय आयुक्त संलग्न व आयएसओ मानांकनप्राप्त पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने देण्यात येणारा प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड २०२५ विजय कदम यांना जाहीर झाला असल्याची माहिती ट्रस्टचे संस्थापक/अध्यक्ष डॉ.संदीप डाकवे यांनी दिली आहे. या पुरस्कारांचे स्वरुप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ, गमजा आणि कोल्हापूरी फेटा असे आहे.पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून यासंदर्भात प्रस्ताव मागवण्यात आले होते. आलेल्या 300 प्रस्तावामधून 35 व्यक्ती व संस्था यांची निवड करण्यात आली आहे. स्पंदन ट्रस्टच्यावतीने कला, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, वैद्यकीय, उद्योग, कृषी व क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना राज्यस्तरीय प्राईड ऑफ



स्पंदन अवॉर्ड देवून गौरवण्यात येते. विजय कदम यांना सामाजिक आणि शैक्षणिक या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्काराचे वितरण शनिवार दि.25 ऑक्टोबर, 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृह, कराड, ता.कराड, जि.सातारा येथे होणार आहे. पुरस्कार सोहळयाचे हे सातवे वर्ष आहे. या पुरस्काराबद्दल विजय कदम यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# उज्जैनकर फाउंडेशनच्या आयोजित त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक येथील संमेलनाची सभा उत्साहात संपन्न

## दिनांक 31 जानेवारी व 1 फेब्रुवारी 2026 दोन दिवशीय चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगरची नाशिक जिल्हा त्याचप्रमाणे उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यकारणीची सभा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवचरण उज्जैनकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच सिटी सेंटर मॉल चौथा मजला फुड कोर्ट नाशिक येथे उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी फाउंडेशनचे चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक या ठिकाणी दिनांक 31 जानेवारी व 1 फेब्रुवारी 2026 रोजी दोन दिवसीय आयोजित करण्यात आले आहे या विषयासंदर्भात या मीटिंगमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली याप्रसंगी



फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा.संदीप गोसावी सर उत्तर महाराष्ट्र विभागीय प्रसिद्धी प्रमुख, आपली दुनियादारी चॅनलचे संपादक श्री कुमार कडलक साहेब फाउंडेशनचे नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रा.डॉ. प्रशांत रणसुरे सर नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख प्राचार्य डॉ.कृष्णा शहाणे सर श्री प्रविण गांगुर्डे सर आपली दुनियादारी चॅनलच्या कार्यकारी संपादक रश्मी मारवाडी, श्री महाले सर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते याप्रसंगी सर्व पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले हे संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी यांनी सांगितले शेवटी या सभेचे आभार फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा.संदीप गोसावी सर यांनी केले.
या प्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर व फाऊंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा.संदीप गोसावी सर आणि नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रा.डॉ.प्रशांत रणसूरे सर यांनी नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार तथा साहित्यिक श्री नानासाहेब बोरस्ते त्याचप्रमाणे नाशिक मनपाच्या उपायुक्त डॉ. संगीता नांदुरकर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची सदिच्छ भेट घेऊन संमेलना विषयी चर्चा करणे आली याप्रसंगी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे संत श्री निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिराचे व्यवस्थापक श्री कृष्णा बदादे यांना संमेलन घेण्यासंदर्भात पत्र सुद्धा देण्यात आले त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे शंकरानंद सरस्वती महाराज, राष्ट्रसंत 1008 सोमेश्वरानंद स्वामी, स्वामी सचिन महाराज, कोल्हापूर येथील संमेलनात फाउंडेशनचा आदिशक्ती संत मुक्ताई अध्यात्म सेवा पुरस्कार प्राप्त ह.भ.प. संजय नाना धोंडगे, सागर पैठणे गुरुजी, लाड सोनार समाज ट्रस्टचे अध्यक्ष श्री विलास देवरे मामा, आरसादेवी ट्रस्टचे अध्यक्ष श्री मिलिंद धारणे या मान्यवरांच्या भेट घेण्यात आल्या प्रसंगी त्यांनी या संमेलनाला सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे सांगितले. याप्रसंगी डॉ.शिवचरण उज्जैनकर सर यांच्या सोबत फाउंडेशनचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष श्री विजय ईटणारे नाशिक जिल्हा सल्लागार श्री श्याम सोनार आदी उपस्थित होते.

# उमापूरमध्ये गुटखा विक्रेत्यांना पोलीस प्रशासन ‘लक्की’

## गुटखा विक्रेते बाबत सपोनि संदीप पाटील तुमची नजर मेली का ?

बीड (प्रतिनिधी): आरोग्यास हानिकारक असल्यामुळे राज्यात गुटखाबंदी असताना उमापूर गावात सर्रास अवैध गुटखा विक्री सुरू आहे. या खुलेआम विक्रीबाबत पोलीस विक्रेत्यांसाठी ‘लक्की’ ठरत आहे यामुळे चकलांबा पोलीस प्रशासनाची ‘नजर’ मेल्याने गुटख्याचे अवैध विक्रेत्यांचे नागरीकांच्या जीवाशी खेळणे सुरुच असल्याचे जागरूक नागरिकांचे म्हणणे आहे. तंबाखूजन्य पदार्थ गुटखा आरोग्यास हानिकारक असल्यामुळे त्यापासून कर्करोगासारखे गंभीर आजार होतात. या पदार्थांचे सेवन करणाऱ्याला सावधानतेचा इशाराही गुटखा तंबाखूच्या पुड्यांवर नमूद केले जाते. तरुण पिढी नागरिक यापासून होणाऱ्या जीवघेण्या आजारापासून वाचावे यासाठी शासनाने यावर बंदीही घातली आहे. तरीही उमापूर गावात सर्रास गुटखा विक्री सुरू आहे. लोकशाही आघाडीच्या कार्यकाळात नागरिक कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराला बळी पडू नये म्हणून गुटखा, सुगंधित तंबाखू, खर्रा आदी वस्तूंवर कायद्याने बंदी आणली होती.

जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्हाभरात अवैध धंद्याविरोधात मोहिम राबविली आहे. यामध्ये गुटखा, वाळू व नशा संबंधी कारवाया करण्याचे सक्त आदेश देण्यात आलेले आहेत. विशेष ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे सुरू आहेत त्याठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधिक्षकांनी दिले आहेत. त्यानुसार



जिल्ह्यातील ठाणे प्रमुख ॲक्शन मोडवर आले आहेत. मात्र चकलांबा पोलीस याकडे



कानाडोळा का करीत असेल याबाबत उलटसुलट चर्चा ऐकावयास मीळत आहे.

### संदीप पाटील साहेब हे बरे नाही...

चकलांबा पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रमुख पीएसआय दिलीप तेजनकर, पीएसआय नारायण एकशींगे यांनी समाजमनं जींकुन कर्तव्य बजावले होते. समाजात राहून गुन्हेगारात धाक निर्माण केला होता मात्र आज चकलांबा पोलीस समाजापासून तर दूर आहेतच मात्र पोलीसांचा धाकही राहीलेला नाही. गुन्हेगारी वाढली आहे अवैध धंद्याचा उत आला आहे. हद्दितील अनेक वाड्या वस्त्यावरील किराणा दुकानात अवैध दारू विक्री होत आहे, सोर्रट, मटका, गुटखा खुलेआम सुरु आहे यामुळे पोलीसांचा धाक राहीला नाही.

# १७ ऑक्टोबर रोजी बीड येथे होणाऱ्या महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा जाहीर पाठिंबा - प्रा. मनोहर धोंडे

बीड प्रतिनिधी

ओबीसींच्या न्याय हक्कासाठी बीड येथे ओबीसींचे संघर्ष योध्ये मा. ना. छगन भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये १७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महाएल्गार सभेला शिवा संघटनेचा जाहीर पाठिंबा आहे. बीड जिल्ह्यातील तमाम शिवा संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मराठवाड्यातील शिवा संघटनेच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने या महाएल्गार मेळाव्यात सहभागी होऊन ओबीसींच्या एकजुटीची ताकद दाखवावी असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी राज्यभर ठिक-ठिकाणी होणाऱ्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेवुन लढा उभारला आत आहे. त्याचाच भाग म्हणुन दि.०२ सप्टेबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने काढण्यात आलेल्या ओबीसीवर अन्याय करणारा शासन निर्णया विरोधात दि. ०८.०९.२०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात शिवा संघटनेच्या वतीने पहीली याचिका दाखल केली आहे. एवढेच नाहीतर ज्या आझाद मैदानावर २ सप्टेंबरचा जी.आर देण्यात आला त्याच आझाद मैदानावर अन्याय करणारा जी आर रद्द करण्यासाठी शिवा संघटनेच्या वतीने दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रचंड धरणे आंदोलन करण्यात आले. याच



धरणे आंदोलनाच्या व्यासपीठावरून ओबीसीचे संघर्ष योध्दे व मंत्री ना. छगनराव भुजबळ यांनी पावसामुळे रद्द झालेल्या बीड येथील ओबीसीच्या महाएल्गार सभेची घोषणा केली. दि. १७ ऑक्टोबरला ही महाएल्गार सभा ओबीसी नेते मा. ना. छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली घेण्याचे जाहीर केले आहे. या महाएल्गार सभेला शिवा संघटनेसह मराठवाडयातील संपूर्ण ओबीसी समाजाचा जाहीर पाठिंबा आहे.

तरी मराठवाडयातील शिवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वीरशैव लिंगायत समाज बांधवासह संपूर्ण ओबीसी समाजबांधवानी शुक्रवार दि. १७ ऑक्टोवर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले आहे.

# शब्दश्री विलास देवळेकर यांचा वाशी येथे विशेष सत्कार




मुंबई : नवी मुंबईतील वातानुकूलित साहित्य मंदिर, वाशी येथे ‘लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद’ आणि एम.व्ही.एस.-१६३९ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या ६व्या वर्धापन दिन सोहळ्यात शब्दश्री विलास देवळेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.देवळेकर यांच्या सामाजिक कार्य व साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना “राष्ट्रीय ग्राउंड लिडरशिप आयकॉन पुरस्कार” तसेच सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.आयोजक श्री. एन. डी. खान (संकल्पना व नियोजन) आणि सौ. सलमा खान (संयोजिका) यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम यशस्वी झाला. पल्लवी वढवेकर-बर्वे यांनी सुत्रसंचालन केले. देवळेकर यांनी इको साऊंड म्युझिकल सिस्टीमवर कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. शिस्तबद्ध आयोजन, अल्पोपहार व भोजन व्यवस्थेमुळे उपस्थितांनी कार्यक्रमाचे समाधानाने कौतुक केले.

# चाईल्ड केअर तर्फे बालसंस्कार केंद्र मध्ये अन्नदान.

उरण दि १४ चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे सावित्रीबाई फुले झोपडपट्टी उरण येथे अन्नदान व लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष विकास कडू यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रम ुख पाहुणे म्हणून नरेश म्हात्रे (रायगड भूषण ), ॲडवोकेट विजेंद्र पाटील (कायदेशीर सल्लगार ), पत्रकार विठ्ठल ममताबादे (चाईल्ड केअर सामाजिक संस्था मीडिया सल्लागार )उपस्थित होते. तर संस्थेतर्फे विकास कडू (संस्थापक, अध्यक्ष ), मनोज ठाकूर (कार्याध्यक्ष ),विक्रांत कडू (कार्याध्यक्ष ), कु अभिषेक माळी (सदस्य ), कु विवेक कडू (सदस्य )तसेच बालसंस्कार केंद्र मधील सेविका भारती पाटील, किरण घरत, प्रियांका घरत व सावित्रीबाई बाई फुले झोपडपट्टी मधील शेकडो म हिला व बाल संस्कार केंद्र मधील ५० लहान मुले या कार्यक्रमांस उपस्थित होते.या कार्यक्रम प्रसंगी सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकार किरण घरत (भेंडखळ )यांचा चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आले.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नरेश म्हात्रे यांनी संस्थेचे तोंड भरून कौतुक केले

# पूरस्थितीत सभापती रामेश्वर गोरे ठरले खरे संकटमोचक!

## आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलवून अन्न,निवारा व शासकीय मदत मिळवून दिली

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा शहरात काही दिवसां पूर्वी पडलेल्या मुसळधार पावस मुळे अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली. या भीषण परिस्थितीत पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे यांनी लोकांच्या म दतीसाठी पुढाकार घेत खऱ्या अर्थाने संकट मोचकाची भूमिका बजावली. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहून सभापती गोरे यांनी पूरग्रस्त नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याचे जबाबदारीचे काम अत्यंत तत्परतेने पार पाडले. तर पूरग्रस्त नागरिकांसाठी अन्न,निवारा,आणि शासकीय साहाय्य मि ळवून देण्यासाठी त्यांनी धावपळ केली. गोरे यांनी नगरपंचायतच्या यंत्रणेला सतत सज्ज ठेवत मदत पोहोचविण्याचे काम केले. पूरग्रस्त भागातील नागरिकांना धीर देत, त्यांच्या अडचणी ऐकून घेत प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवत उपाययोजना केल्या. नागरिकांची अडचण दूर होईपर्यंत त्यांनी स्वतः घटनास्थळी राहून देखरेख केली. गावातील वयोवृद्ध, महिला, लहान



मुलांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर, अन्नधान्य वितरण, तात्पुरते निवारा केंद्र उभारणे, तसेच नागरिकांना शासकीय मदत मिळवून देणे या सर्व आघाड्यांवर सभापती गोरे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या कार्यामुळे पाटोदा शहरातील अनेक नागरिकांना दिलासा मि ळाला.जनतेच्या सुखदुःखात नेहमी धावून जाणारे आणि लोकांसाठी नेहमी उपलब्ध राहणारे सभापती रामेश्वर गोरे हे आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वातील शिस्तबद्ध आणि जनसेवेप्रती निष्ठावान कार्यकर्त्यांचे प्रतीक ठरले आहेत.

# विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मागणीला यश

## अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान वितरणाचा शासन निर्णय पारित!

### आजी-माजी शिक्षक आमदारासह ८ व ९ जुलै रोजीच्या शाळा बंद आंदोलनाचे हे यश- खंडेराव जगदाळे

बीड दि.१०(प्रतिनिधी)- राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्यानुसार वेतनाच्या ऑक्टोबर महिन्याच्या तरतुदीचा अनुदान वितरण आदेश पारित करावा अशी मागणी राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने करण्यात आली होती या मागणीला यश आले आहे. आज सोमवार दिनांक 13 ऑक्टोबर रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेशही आज जारी करण्यात आला आहे. राज्यातील सर्व आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटना यांच्यासह 8 व 9 जुलै 2025 रोजीच्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे हे यश असल्याचे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सदर शासन आदेश निर्गमित झाल्याने सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव 20 टक्के अनुदाना वितरित करण्यासाठी 25 ऑगस्ट 2025 रोजी शासन निर्णय झाला. परंतु ऑगस्ट सप्टेंबर आणि आता ऑक्टोबर महिना सुरू झाला तरी देखील वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाहीत. 20 टक्के वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना




प्रयत्न करीत होत्या. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने शेवटी विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद करून 20 ऑक्टोबर 2025 पूर्वी वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा व्हावे न झाल्यास 21 ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देत आंदोलनाचे हत्यार उपसले. विना अनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेत प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरणाच्या कामाला सुरुवात केली. सोमवार दि.13 ऑक्टोबर 2025 रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदानाप्रमाणे ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेश आज सोमवार रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. येत्या दोन-चार दिवसात दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने ऑक्टोबर पेड इन ऑक्टोबर असे वाढीव टप्पा अनुदाना प्रमाणे होणारे वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा होणार आहे. या कामी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांच्यासह राज्यातील इतर आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटनांचे प्रयत्न कामी आले असल्याचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com